( इंग्रजीमध्ये टंकलिखित केलेल्या न्यायनिर्णयाचा मराठी अनुवाद )

एस .सी .आर .सुप्रीम कोर्ट रिपोर्टस [१९६१]

**द स्टेट ऑफ बॉम्बे**

**विरुद्ध**

**मेसर्स रतिलाल वाडीलाल आणि ब्रदर्स**

( न्यायमूर्ती जे. एल. कपूर, एम. हिदायतुल्ला आणि जे. सी. शाह )

विक्रीकर - 'विक्रेता' - याचा अर्थ - विशेष अनुमतीद्वारे अपील - जेव्हा उपलब्ध असेल - बॉम्बे विक्रीकर कायदा, १९५३ (बॉम्बे III ऑफ १९५३), कलम २७ (I), (b), (c), ३० (I), ३४ (I) आणि (२)- भारतीय संविधान, अनुच्छेद १३६.

नानालाल करसनदास, जो एक वीट उत्पादक होता, त्याच्याकडे कोलियरी (कोळसाखाण ) नियंत्रण आदेश अंतर्गत कोळसा खरेदी करण्यासाठी प्राधान्य प्रमाणपत्र होते आणि त्याने मेसर्स एस. जी. रूंगटा कोलियरीकडून उत्तरवादीमार्फत जे कमिशन एजंट (अडत्या) होते काही प्रमाणात कोळसा खरेदी केला होता. बॉम्बे विक्री कर अधिनियम १९५३ अंतर्गत त्यांचे "विक्रेते" म्हणून वर्णन केले जाऊ शकते की नाही हे निर्धारित करण्यासाठी उत्तरवादींनी जिल्हाधिकाऱ्यांकडे अर्ज केला. जिल्हाधिकाऱ्यांनी ते विक्रेते असल्याचे अधिनिर्णित केले, परंतु विक्रीकर न्यायाधिकरणाने वेगळे मत मांडले. त्यानंतर कायद्याच्या कलम ३४ (I) आणि ३० (I) अंतर्गत उच्च न्यायालयात संदर्भासाठी कोणतीही पावले उचलली गेली नाहीत.

विशेष अनुमतीद्वारे बॉम्बे राज्याने केलेल्या याचिकेवर, उत्तरवादींचे कायद्यांतर्गत 'विक्रेते' म्हणून वर्णन केले जाऊ शकत नाही, कारण त्यांनी उघड केल्याप्रमाणे त्यांच्या व्यवसायाचे स्वरूप हे दर्शवत नाही की ते बॉम्बे राज्यात वस्तू विक्रीचा व्यवसाय करत होते, परंतु ते केवळ इतर व्यक्तींना विक्रीची व्यवस्था करणारे फक्त कमिशन एजंट (अडत्या) होते.

संविधानाच्या अनुच्छेद १३६ अंतर्गत या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राचा वापर करण्यापूर्वी उच्च न्यायालयात जाणे आणि त्यांना उपलब्ध असलेल्या सर्व उपायांचा वापर करणे हा अपीलकर्त्यासाठी योग्य मार्ग होता.

**दिवाणी अपील न्यायाधिकार क्षेत्र: दिवाणी अपील क्रमांक ४२९/१९५९.**

१९५६ च्या अपील क्रमांक ६ मधील पूर्वीच्या बॉम्बे विक्रीकर न्यायाधिकरणाच्या दिनांक ६ डिसेंबर १९५७ च्या न्यायनिर्णय आणि आदेशावरून विशेष अनुमतीद्वारे याचिका.

अपीलकर्त्याची बाजू भारताचे सॉलिसिटर जनरल (महान्यायाभिकर्ता ) सी. के. दफ्तरी, एच. आर. खन्ना आणि आर. एच. ढेबर यांनी मांडली.

उत्तरवादींची बाजू  एन. ए. पालखीवाला, एस. पी. मेहता, जे. बी. दादाचनजी, रामेश्वर नाथ आणि पी. एल. वोहरा. यांनी मांडली.

१५ नोव्हेंबर १९६०. न्यायालयाचा निर्णय न्यायमूर्ती हिदायतुल्लाह यांनी दिला:- दिनांक ६ डिसेंबर १९५७ रोजी विक्री कर न्यायाधिकरण, बॉम्बेने दिलेल्या आदेशाविरुद्ध बॉम्बे राज्याने विशेष अनुमतीद्वारे या न्यायालयात अपील केले आहे,

ज्याद्वारे न्यायाधिकरणाने त्यांच्यासमोर अपील करण्यास परवानगी दिली आणि बॉम्बे विक्री कर कायदा, १९५३ च्या कलम २७ अंतर्गत जिल्हाधिकारी, विक्री कर यांनी पारित केलेला आदेश बाजूला सारला.

उत्तरवादी, रतिलाल वाडीलाल आणि ब्रदर्स., निष्कासन आणि वाहतूक कंत्राटदार म्हणून व्यवसाय करणारे कमिशन एजंट (अडत्या) आहेत. दिनांक २५ जून १९५४ रोजी त्यांनी विक्रीकर जिल्हाधिकारी, बॉम्बे यांच्याकडे, कायद्याच्या कलम २७ (क ), (ख ) आणि (ग ) अंतर्गत, त्यांच्या व्यवसायाच्या स्वरूपाचे वर्णन करून, त्यातील एका उदाहरणाचा हवाला देत, कायद्यांतर्गत त्यांना "विक्रेते" म्हटले जाऊ शकते की नाही या प्रश्नाचे निर्धारण करण्यासाठी अर्ज केला. जिल्हाधिकारी यांनी त्यांच्या आदेशानुसार असे म्हटले की ते "विक्रेते" आहेत आणि त्यांनी कायद्यांतर्गत स्वतःची नोंदणी करणे आवश्यक आहे. अपीलवर, न्यायाधिकरणाने वेगळा निर्णय दिला आणि म्हणूनच बॉम्बे राज्याने हे अपील दाखल केले.

असे दिसते की, कायद्याच्या कलम ३० (१) आणि (२) सह वाचन केलेल्या कलम ३४ (१) अंतर्गत मुंबई उच्च न्यायालयाकडे संदर्भ मागण्यासाठी कोणतीही कारवाई करण्यात आली नाही. आमच्या वारंवार लक्षात आले आहे की अपीलकर्त्यासाठी खुले असलेले सर्व उपाय या न्यायालयात येण्यापूर्वी त्याने वापरले नाहीत. सामान्यतः, हे न्यायालय उच्च न्यायालयाला अशा प्रकारे बायपास करण्याची (वगळण्याची) परवानगी देणार नाही आणि अनुच्छेद १३६ अंतर्गत या न्यायालयाच्या अधिकारक्षेत्राचा वापर करण्यापूर्वी अपीलकर्त्याने त्याला उपलब्ध

असलेल्या सर्व उपायांचा वापर करणे हा योग्य मार्ग आहे. सध्याच्या प्रकरणात, तथापि, हे प्रकरण सोपे आहे आणि उत्तरवादीच्या विद्वान वकिलाने आम्हाला प्रश्न निर्णीत करण्याची विनंती केली, असे सांगून की त्याचा ग्राहक जो एक लहान व्यापारी होता आणि ज्याने कायद्याच्या स्पष्टीकरणासाठी अर्ज केला होता, जर आम्ही या छोट्या मुद्द्यावर या याचिकेचा निर्णय घेतला तर त्याला पुन्हा एकदा न्यायालयांमध्ये ओढले जाईल. हे लक्षात घेता, जरी आम्ही या याचिकेवर निर्णय घेतला असला तरी, आम्हाला या न्यायालयासाठी 'कर्सस क्युरी' ( *cursus curiae*-न्यायालयाची कार्यप्रणालीच न्यायालयाचा कायदा असतो ) ठरवण्यास भाग पाडले जाऊ नये.

हे प्रकरण कोलियरी (कोळसाखाण ) नियंत्रण आदेश, १९४५ , लागू झाल्यानंतरच्या काळाशी संबंधित आहे. त्या आदेशानुसार, केंद्र सरकारच्या अधिकाराखेरीज कोणतीही व्यक्ती कोळसा खाणीतून कोळसा मिळवू शकत नाही किंवा खरेदी करू शकत नाही, ज्यासाठी त्याला राज्य कोळसा नियंत्रकांकडून प्राधान्य प्रमाणपत्र घेणे आवश्यक होते. आदेशातील योजनेअंतर्गत, डेल क्रेडर एजंट्ना (परिशोधी अभिकर्ता ) कृति करण्याची आणि प्रति टन कोळशावर एक रुपया कमिशन आकारण्याची परवानगी होती.

एक वीट उत्पादक नामे नानालाल करसनदास यांना दिनांक १७ जून १९५४ रोजी २२ टन कोळशाच्या बाबतीत प्राधान्य प्रमाणपत्र देण्यात आले. त्यांनी उत्तरवादींच्या माध्यमातून बुरहार येथील मेसर्स एस. सी. रुंगटा कोलियरीशी

व्यवहार केला. ही खेप करसनदास यांच्या नावावर होती, परंतु कोलियरीने बिल उत्तरवादींना पाठवले होते आणि उत्तरवादींनी त्याच्या बदल्यात एक बिल तयार केले ज्यामध्ये त्यांनी कोलियरीच्या बिलाच्या रकमेव्यतिरिक्त रु. २२ शुल्क हे त्यांचे कमिशन म्हणून आकारले. कोलियरीला पैसे देण्याचे दायित्व उत्तरदात्यांवर अवलंबून होते, परंतु त्यांनी असा दावा केला की ते कोलियरी आणि करसनदास यांच्यातील "मध्यस्थ" म्हणून काम करत आहेत. उत्तरवादींनी असे नमूद केले की, त्यांचा व्यवसाय इतर घटकांसोबतही याच धर्तीवर होता आणि त्यांनी जिल्हाधिकारी यांना कायद्यात त्यांचे "विक्रेते" म्हणून वर्णन केले जाऊ शकते का आणि नोंदणी आवश्यक आहे का हे निर्धारित करण्यास सांगितले.

बॉम्बे विक्रीकर अधिनियम, १९५३ मध्ये "विक्रेत्याची" व्याख्या खालीलप्रमाणे आहे:

"विक्रेता " म्हणजे बॉम्बे राज्यात वस्तू विक्रीचा व्यवसाय करणारी कोणतीही व्यक्ती, मग ती दलाली (कमिशन), मोबदला किंवा अन्य प्रकारे असो. ......" (स्पष्टीकरण वगळण्यात आले आहे.)

असे दिसते की विक्रेता होण्यासाठी, व्यक्तीने बॉम्बे राज्यात माल विक्रीचा व्यवसाय केला पाहिजे. त्यामुळे या प्रकरणातील अल्प प्रश्न असा होता की, उत्तरवादी कोळशाच्या संदर्भात असा व्यवसाय करत आहेत का ?

नियंत्रण आदेशातील योजना असे दर्शवते की, कोळशाची विक्री प्रमाणपत्र धारण केलेल्या व्यक्तीलाच होऊ शकते. अन्यथा, इतर कोणतीही विक्री नियंत्रण

आदेशाचे उल्लंघन करणारी असेल. या प्रकरणात जे प्रमाणपत्र सादर केले गेले आहेत, ते उत्तरवादींच्या नावाने तयार केले गेले असले, तरी ते उपभोक्त्याला मालप्रेषिती ( कन्साइनी) म्हणून दर्शवते. अशा प्रकारे हे स्पष्ट आहे की, कोलियरीद्वारे उत्तरवादींना कोणतीही विक्री केली गेली नाही, परंतु उत्तरवादींच्या अभिकरणद्वारे ( एजन्सीद्वारे) थेट करसनदास यांना विक्री केली गेली. उत्तरवादींनी देखील, जेव्हा त्यांनी करसनदासकडे देयक मांडले, तेव्हा त्यांनी असे नमूद केले की ते मालप्रेषिती होते आणि ते केवळ त्यांचे "मध्यस्थ" शुल्क आकारत होते. या परिस्थितीत, कोलियरीने उत्तरवादींना कोळसा विकला आणि त्या बदल्यात त्यांनी तो करसनदासला विकला हे मानणे कठीण आहे. त्यात दोन विक्री समाविष्ट नव्हत्या ; फक्त एक विक्री समाविष्ट होती आणि ती कोलियरीद्वारे उपभोक्त्यांना होती. कोलियरी कडून खरेदी करून उत्तरवादी कधीही मालक बनले नाहीत, कारण कोलियरीने त्यांना कोळसा विकला नसता किंवा त्यांनी प्रमाणपत्र प्राप्त केल्याशिवाय ते खरेदी करू शकले नसते. उत्तरवादींचे स्थान केवळ अभिकर्त्याचे (एजंट्सचे) होते, जे प्रकट खरेदीदारासाठी विक्रीची व्यवस्था करतात, तरीही त्यांच्या प्रकर्त्याच्या (प्रिंसिपलच्या) वतीने कोलियरीला पैसे देण्याची हमी देतात. आम्ही जे नमूद केले आहे ते लक्षात घेता, जिल्हाधिकारी यांच्यासमोर उद्धृत केलेल्या प्रकरणात कोळसा विक्रीचा कोणताही व्यवसाय उघड करण्यात आला नाही आणि न्यायाधिकरणाचा आदेश त्यांच्यासमोर मांडण्यात आलेल्या तथ्यांनुसार योग्य होता.

परिणामी, अपील अयशस्वी होते आणि खर्चाच्या आदेशासह फेटाळले जात आहे .

याचिका फेटाळण्यात आली.

*****

**अस्वीकरण**

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याची कारणाकरता वापर करता येणार नाही. तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

*****